प्रेस नोट

जळगाव तालुका पोस्टे, जळगाव
दि.११/०६/२०२६

प्रती,

मा.संपादक सो,

--------------------------------------

**विषय :- जळगाव तालुका पोलिसांची धडक कारवाई चाकूचा धाक दाखवून लुटणाऱ्या ४ अट्टल गुन्हेगारांना २ तासांत ठोकल्या बेड्या.**

**महोदय,**

दिनांक ११/०६/२०२६ रोजी रात्री ०१:३० ते ०३:४५ वाजेच्या सुमारास फिर्यादी चेतन प्रकाश पाटील वय ३५, रा. खोटे नगर, जळगाव हे त्यांच्या साथीदारांसह मोटरसायकलने जळगाव ते पाळधी रोडवरून जात होते. दरम्यान, हॉटेल साई गार्डन आणि हॉटेल राधिका जवळ सार्वजनिक रस्त्यावर ४ आरोपींनी त्यांची मोटरसायकल अडवली. आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या मित्रांना चाकुचा धाक दाखवून, चापटबुक्क्यांनी बेदम मारहाण केली व शिवीगाळ करत दमदाटी केली. आरोपींनी त्यांच्या खिशातील एकूण ७,८००/- रुपये रोख रक्कम जबरदस्तीने हिसकावून घेतली आणि फिर्यादींच्या मोटरसायकलची तोडफोड करून घटनास्थळावरून पळ काढला.

याप्रकरणी जळगाव तालुका पोलीस ठाण्यात गुरंनं. १७८/२०२६, भारतीय न्याय संहिता (BNS) चे कलम ३०९(४), १२६, ११५(२), ३५१(२), ३५२, ३२४(४), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस पथकाची तात्काळ कारवाई:

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून जळगाव तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. शशिकांत पाटील यांनी डीबी (DB) पथक त्वरित रवाना करुन पथकाने अत्यंत कसोशीने व गुप्त माहितीच्या आधारे शोध घेत अवघ्या २ तासांच्या आत ४ ही आरोपींना जेरबंद केले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे व गुन्हेगारी पार्श्वभूमी

१. चेतन उर्फ बटाटा रमेश सुशीर (वय २१, रा. संत मिराबाई नगर, जळगाव) हा पोलीस अभिलेखावरील अट्टल गुन्हेगार असून हिस्ट्रीशीटर आहे. त्याच्यावर जिल्हा पेठ पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे (गुन्हा रजि. नं. ३०/२५ आणि ३७/२५) दाखल आहेत.

२. उमाकांत दत्तात्रेय जाधव (रा. संत मिराबाई नगर, जळगाव) हा देखील सराईत गुन्हेगार असून त्याला जिल्हापेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीतून तडीपार/हद्दपार करण्यात आलेले आहे. त्याच्यावर जिल्हापेठ (३०/२५), जळगाव शहर (२२५/२५) आणि एमआयडीसी पोलीस स्टेशन (८६८/२२) या ठिकाणी शरीराविरुद्धाचे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

३. गौरव संजय जाधव (वय २१, रा. साई नगर, जळगाव)

४. रोशन भगवान पाटील (वय २६, रा. पांडुरंग नगर, जळगाव)

सदरची यशस्वी कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धीवरे सर, मा. अप्पर पोलीस अधीक्षक सो श्री.संदीप गावीत साहेब, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी (DYSP) श्री. नितीन गणापुरे साहेब व जळगाव तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शशिकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाचे सफौ- सुनिल पाटील, पोलीस हवालदार योगेश पाटील, पोलीस हवालदार अविनाश देवरे, कैलास इंगळे, पोलीस कॉन्स्टेबल प्रविण कोळी, दीपक देवरे, किरण पाटील आणि वाहन चालक पोहेकॉ पंकज देशमुख यांनी केली असुन गुन्ह्याचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक शामकुमार मोरे हे करीत आहेत.

11-06-26

पोलीस निरीक्षक
जळगांव तालुका पो.स्टे.

